नमुना : ६ - अ

पहिली खबर

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये) 1287

१. जिल्हा : नंदुरबार पोलीस ठाणे : नवापुर वर्ष : २०१

पहिली खबर क्र. : ६४५ तारीख : ०६/१०/२०२०

२. अ) अधिनियम बेकायदा कलमे ७(अ)

ब) अधिनियम ९८९ कलमे .....

क) अधिनियम मुंबई २०१८ कलमे .....

ड) अधिनियम ..... कलमे .....

३. अ) अपराधाची घटनेचा वार : दि. ६/१०/ रोजी पासून दि. ६/१०/ रोजी

वेळेचा अवधी १५/२२ वा. पासून १५/२३ वा. पर्यंत.

ब) पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख ६/१०/२०२० वेळ २३/४०

क) सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्र. ३१ वेळ २३/४०

४. माहितीचा प्रकार लेखी/तोंडी

५. घटनेचे ठिकाण तहसिल कार्यालय नवापुर येथे पहिल्या माळ्यावरील निवासी नायब तहसिलदार

अ) पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर ५०० मि. गस्तक्षेत्र क्र. चार्ली सेक्टर

ब) पत्ता .....

क) या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नांव

पोलीस ठाणे ..... जिल्हा .....

६. तक्रारदार/खबरी :

अ) नांव : जालमसिंग रेवजी गावीत

ब) पित्याचे/पतीचे नांव : ..... वय वर्षे

क) जन्म तारीख/वर्ष : ..... राष्ट्रीयत्व : भारतीय

ड) पारपत्र क्र. : ..... दिल्याची तारीख : ..... दिल्याचे ठिकाण : .....

इ) व्यवसाय : शिक्षण

ई) पत्ता : वागदी ता. नवापुर जि. नंदुरबार

.....

७. पळून गेलेला/पळून गेलेले/संशयित/माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.)

रोगवेल रागदास गावीत

रा. नायब्रिये ता. नवापुर

संशयितांची शारीरीक लेखण, व्यंग आणि इतर तपशील :-

शिंप १	जन्मतारीख /वर्ष २	बांधा ३	रंगी (गोरी/काळी) ४	वर्ण ५	ओळख ६	व्यंग/वैशिष्ट्ये ७	दात ८	केस ९

डोळे १०	सवयी ११	पोशाखाच्या सवयी १२	भाषा/ बोली भाषा १३	माजल्याची खुण १४	कोड १५	तीळ १६	व्रण १७	गोंदण १८

जर तक्रारदार/खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावे. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी. या अनुशंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीतांचा इतर गुन्ह्यांतील सहभाग स्पष्ट करेल. वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुन:श्च तयार करावी.

८. तक्रारदाराने/खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

.....

.....

९. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडवा.)

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

.....

नमुना : ६ - ब

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य : .....

परतान्वेषण अहवाल/यु.डी. प्रकरण क्र. जर असल्यास : .....

१०. पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत.)

वरील ता. वेळे व ठिकाणी यातील मुळ तक्रारदार यांचे वडीलांचे नाते असलेले वरील ता. नवापुर शिवारात वडीलोपार्जीत शेत जमिन असुन गट नं १६/१ क्षेत्र ३.६० हे.आर. इतकी त्यांचे कब्जे २ एकर ३२ आर असुन तक्रारदार यांचे वडील नामे रेवजी पान्या गावीत यांचा कब्जा क्र १ ते क्र २ यांचे नावे चारही सातबारा दि. ५/१०/२०२० रोजी तलाठी तहसिल कार्यालय नवापुर येथुन घेतला त्यानंतर दि. ७/१०/२०२० रोजी तहसिल कार्यालय कर्मचारी एकुण ५ यांनी फिर्यादिचे हक्के तक्रारीचा नायब तहसिलदार यांचे समोर कामाचे मोबदल्यात आज दि. १०/१०/२०२० रोजी ५००/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष केली व लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले.

११. केलेली कार्यवाही : वरील क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरून दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले.

अन्वेषण अधिकारी श्री. ए.ची. अहिरराव नेमणूक P.I.

यांना तपास काम हाती घेण्याचा निर्देश दिला/तपास करण्याचे नाकारले/अधिकारितेच्या मुद्दयास ..... पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला/खबरीस प्रत मोफत दिली. :

अ) चार्ज सिट/फायनल नंबर : ..... कोर्टाचा नंबर : .....

१४. कोर्टाचा निकाल : .....

.....

.....

व्हिलेज क्राईम नोट बुक क्र. : .....

१५. तक्रारदाराची सही/अंगठा

पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

नांव निवेरा दहिफळे

पदनाम पो.नि. क्रमांक .....

१६. कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ : .....

Scanned by CamScanner

फिर्याद

नवापूर पोलीस ठाणे
दि.०६/१०/२०२०

मी, जालमसिंग रेवजी गावीत, वय २७ वर्षे, धंदा–शिक्षण,एम.फिल. रा. वागदी तो. नवापूर जि.नंदुरबार मो.नं. ७२६४०४७१०८

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत असुन माझे एम.फिल.पावेतोचे शिक्षण झाले असुन सध्या गरीब आहे. माझे वडील शेती करून कुटुंबाचा उदर निर्वाह करतात.मी काल दि ०५/१०/२०२० रोजी श्री.जाधव सो.ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार यांना फोनने कळविले होते की, माझेकडुन एक-शासकीय कर्मचारी लाचेची मागणी करीत आहे. माही त्यास लाच देण्याची मुळीच इच्छा नाही. तरी आपण नवापूर येथे येणुन त्याचेवर कारवाई करावी असे कळविले होते. त्यावरून मला श्री.जाधव सो.यांनी सांगीतले की, उदया दिनांक ०६/१०/२०२० रोजी आमचे अधिकारी श्री.जयपाल अहिरराव व स्टाफ अशांना नवापूर येथे पाठवितो व मला ठरल्याप्रमाणे नवापूर शहाराचे बाहेर असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोलपंपाजवळील होलीपाडा रोडाजवळ थांबण्यास सांगीतले. त्यावरून मी आज दि. ०६/१०/२०२० रोजी नवापूर शहाराचे बाहेर असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोलपंपाजवळील होलीपाडा रोडाजवळ थांबुन होतो.

मी आज दि.०६/१०/२०२० रोजी सकाळी १०.१० वाजेचे सुमारास ठरल्याप्रमाणे नवापूर शहाराचे बाहेर असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोलपंपाजवळील होलीपाडा रोडाजवळ येथे हजर असतांना एक खाजगी वाहन क्रमांक एम.एन.३९ एसी ५२८६ व एक सरकारी वाहन क्रमांक एम.एन.३९ ए. ०१९२ ही आली सदर गाडीत वसलेले अधिकारी व कर्मचारी यांनी मला जवळ बोलवुन त्यांनी मला माझे नाव गाव विचारले मी त्यांना माझे नाव गाव सांगीतले असता पोनि अहिरराव यांनी त्यांची व सोबत असलेल्या श्री. जाधव साहेब, स्टाफ व पंचांची एकमेकांशी ओळख करून घेतली.त्यानंतर आपण आपणासोबत असलेल्या पंचासमक्ष तक्रारीविषयी विचारपुस करून मी स्वइच्छेने शासकीय लेखी तक्रार दिली की, मी वरील ठिकाणी आई वडिलांसह एकत्र राहतो व सध्या एम.फिल.चे शिक्षण घेवुन गरीब आहे. माझे वडिल शेती करून कुटुंबाचे उदरनिर्वाह करीत आहे.माझ्या वडिलाचे नावे मौजे वागदी ता. नवापूर शिवारात वडिलोपार्जित शेत जमीन असुन गट नं.१६/१ असा असुन त्याचे क्षेत्र २ हेक्टर ३२ आर. आहे. माझे वडिल रेवजी पाल्या गावीत व काका १)शिवाजी पाल्या गावीत २)शेगा पाल्या गावीत अशांच्या नावे वडिलोपार्जित शेती असुन गरची कामे मी स्वत: पाहत असतो. सदर शेती वरील दोघे काका वारस आहेत. माझे वडिल रेवजी पाल्या गावीत हे निरक्षर व वयोवृध्द आहेत सदर शेती वाटणीसाठी माझे वडिल रेवजी गावीत यांनी मा. तहसिलदार नवापूर यांना दि. १८/०२/२०२० रोजी अर्ज केला होता. त्यावरून मी दि. १७/०९/२०२० तहसिल कार्यालय नवापूर येथे गेलो असता सदर कार्यालयातील कर्मचारी श्री. सोमु गावीत यांना भेटलो. त्यांनी मला वडिलांचे व दोघे काकांचे शेतजमीनीचे वाटणीसाठी नोटीस दिली व त्यांनी सांगितले की, सदर काम करून देण्यासाठी तुम्हाला मला पैसे दयावे लागतील तेव्हाच मी तुमचे काम करील असे सांगितले. तेव्हा मी त्याना विनंती केली परंतु ते ऐकुन घेण्याच्या मनस्थितीत नव्हते तेव्हा माझ्याकडे पैसे नसल्याने मी त्यांना नंतर येतो असे सांगितले,आज रोजी आम्ही नोटीसाने अनुपंगाने तहसिल कार्यालय, नवापूर येथे सदर कार्यालयातील कर्मचारी श्री. सोमु गावीत यांच्याशी बोलणी करायला जाणार आहे. श्री. सोमु गावीत मागत असलेले पैसे हे कोणतेही शासकीय फी नाही ती लाचच आहे अशी माझी खात्री झाली आहे त्यांना लाच देण्याची माझी इच्छा नाही परंतु पैसे दिले नाही ते माझे काम करणार नाही. माझे व श्री. सोमु गावीत कार्यालयातील कर्मचारी यांचे कोणतेही आर्थिक देणघेणेचे व्यवहार नाही तसेच पुर्ववैमनस्य नाही,तरी लाच मागणा–या शासकिय तहसिल कार्यालयातील कर्मचारी श्री. सोमु गावीत यांच्यावर कार्यवाही करावी ही विनंती आहे. अशी लेखी तक्रार पंचांसमक्ष दिली होती. त्यांनतर दोन्ही पंचांना मी लिहुन दिलेली लेखी तक्रार वाचण्यास दिली. त्यावेळी मी सांगीतलेली तोंडी हकीकत व लेखी तक्रार सारखी असल्याने सदर तक्रारीवर दोन्ही पंच व पोनि अहिरराव अशांनी सहया केल्या होत्या.त्यानंतर पोनि अहिरराव सो. यांनी सांगीतले की, लाचेच्या सापळ्य कार्यवाही मध्ये सुरूवातीला पडताळणी करणे आवश्यक असल्याने त्यांनी सोनी कंपनीचा एक डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व सॅनडिस्क मायक्रो एस.डी.–८ जी.बी.चे एक सीलबंद मेमरी कार्ड बाहेर काढून दोन्ही पंच व माझेसमक्ष हजर केले. सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर कसे हाताळण्यात येते याची सविस्तर माहिती पोनि अहिरराव यांनी मला व दोन्ही पंचांना दिली. त्यासोबतच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर हाताळणीचे प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर त्यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालवून त्यामध्ये पूर्वीचे कसलेही रेकॉर्डींग नसल्याची दोन्ही पंचांनी खात्री केली. त्यानंतर पोनि अहिरराव यांनी वरील मेमरी कार्ड डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये टाकून मेमरी कार्ड वर देखील पूर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची दोन्ही पंचांची व माझी खात्री करुन दिली. त्यानंतर पोनि अहिरराव यांनी मला व पच नं.१ प्रशांत वसावे यांना पडताळणी पंचनामाकामी योग्य त्या सुचना देवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर माझे शर्टाने आतील बनियनला लावून ते सुरू केले ती वेळ १०:५२ वाजेची होती, त्यानंतर मला सोमु गावीत यांची भेट घेण्यासाठी पच नं.१ यांचेसह माझे ताब्यातील खाजगी मोटार सायकलीने नवापूर शहरातील तहसिल कार्यालयात निवासी नायब तहसिलदार यांचे कार्यालयात गेलो असता त्याठिकाणी सोमु गावीत हे भेटले. त्यावेळी आमनेत शेती वाटणीच्या कामाबाबत चर्चा झाली परंतु त्यावेळी त्यांनी स्पष्टपणे माझेकडेस लाचेची मागणी केली नसल्याने मी परत आपण थांबल्या ठिकाणी परत आलो. त्यावेळी आपण माझेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला ती वेळ १२.१० वाजेची होती. आपण मला पंचासमक्ष विचारणा करून स्क्रिप्ट ऐकली. सदर संभाषणात सोमु गावीत यांनी मला सांगितले काय दयायचे ते देवून टाक अशी असण्ट लाचेची मागणी केल्याचे समजुन आल्याने आपण सर्वांनी पुन्हा पडताळणीसाठी पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोनि अहिरराव यांनी पुन्हा मला व पंच नं.१ प्रशांत वसावे यांना पडताळणी पंचनामाकामी योग्य त्या सुचना देवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये फोल्डर नंबर २ ची निवड करून माझे शर्टाने आतील बनियनला लावून ते सुरु केले ती वेळ १३:१२ वाजेची होती. त्यानंतर मला सोमु गावीत यांची भेट घेण्यासाठी पुन्हा पंच नं.१ यांचेसह माझे ताब्यातील खाजगी मोटार सायकलीने नवापूर शहरातील तहसिल कार्यालयात निवासी नायब तहसिलदार यांने कार्यालयात गेलो असता त्याठिकाणी सोमु गावीत हे भेटले. त्यावेळी आमनेत शेती वाटणीच्या कामाबाबत चर्चा झाली त्यावेळी सोमु गावीत यांनी माझेकडेस ५००/–रू. लाचेची मागणी केल्याने मी थोडया वेळानंतर पैसे आणून देतो असे सागून मी व पंच नं.१ श्री. प्रशांत वसावे असे आपण थांबल्या ठिकाणी परत आलो, त्यावेळी आपण माझे शर्टाचे आतील बनियनला लावलेले डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केले ती वेळ १३.५१ वा.ची होती. त्यानंतर आपण मला पंचासमक्ष विचारणा केले असता त्यावेळी मी सांगितले की, मी व पंच नं.१वसावे असे पडताळणीकामी तहसिल कार्यालय, नवापूर येथे गेलो असता त्याठिकाणी निवासी नायब तहसिलदार यांचे कार्यालयात सोमु गावीत हे भेटले त्यांचेशी मी माझे शेती वाटणीचे कामाबाबत बोलणी केली असता त्यानंतर सोमु गावीत यांनी माझेकडे ५००/–रू. लाचेची मागणी केली आहे, बाबत सांगितले त्यानंतर आपण माझे सोबत असलेले पंच नं.१ श्री. वसावे यांना विचारपुस केली असता त्यांनी देखील मी सांगितलेल्या हकिगतप्रमाणे सांगितले. त्यानंतर आपण माझेत व सोमु गावीत यांचेत डिजिटल, व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण लॅपटॉप संगणकावर पंचासमक्ष ऐकले त्यात सोमु गावीत याने माझे शेतीच्या वाटणीच्या कामाच्या मोबदल्यात ५००/–रू. लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने त्याबाबत पोनि अहिरराव यांनी रोजी नवापूर शहाराचे बाहेर असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोलपंपाजवळील होलीपाडा रोडाजवळ येथे सरकारी वाहनात सविस्तर लाचेची पडताळणी व सापळापुर्व पंचनामा केला आहे.त्यानंतर ठरल्याप्रमाणे सर्वानुमते यशस्वी सापळा कारवाई करण्याचे ठरविले होते. त्यावेळी पोनि अहिरराव यांचे सुचनेवरून पोना/मराठे यांनी दोन्ही पंचासमक्ष एक सिलबंद खाकी पाकिट दाखविले. त्यावर ॲन्थोसिन पावडर असे लेबल होते. त्या पावडर बाबत पोना/मराठे यांनी माहिती दिली की, सदर पावडर नोटांना किंवा कपडयांना लावली असता ती साध्या उजेडात दिसुन येत नाही. सदर पावडर पाहण्यासाठी अंधार करून त्यावर अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश टाकल्यावर फिकटसर हिरवट रंगाची चकाकी दिसुन येते. बाबत ॲन्थासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा यांचे गुणधर्म समजावुन सांगितले होते. त्यानुसार दोन्ही पंचांना व मला सापळापुर्व पंचनाम्यात नमुद सुचना पुन्हा देवून मी माझे शेतीचे बचतीतुन आणलेले ५००/–रूपये त्यात ५००/–रुपये दराची एक चलनी नोट पोनि अहिरराव यांचेसमक्ष हजर केल्याने त्यांचे सुचनेनुसार सदर नोटेस पोना/मराठे यांनी ॲन्थोसिन पावडर लावली त्याबाबत सविस्तर पडताळणी व सापळापुर्व पंचनामा नवापूर शहाराचे

असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोलपंपाजवळील होलीपाडा रोडाजवळ येथे सरकारी वाहनात करण्यात आला आहे. त्यानंतर पोनि अहिरराव यांनी दिलेल्या सुचनेनुसार पोना/मराठे यांनी अ.गा.पावडर लावलेल्या नोटेची एकेरी घडी करून ती नोट माझे शर्टाचे पुढील बाजुस असलेल्या डावेकडील खिशात ठेवल्या. त्यावेळी पोनि अहिरराव यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये दोन्ही पंचांसमक्ष सिलबंद नवीन ८ जी.बी.चे कोरे मेमरी कार्ड टाकून व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियनला आतील बाजूने लावून सदरचे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु केले. ती वेळ १५.२२ वाजेची होती.त्यानंतर मला व पंच नं. १ श्री.प्रशांत वसावे असे समुवेल गावीत यास भेटण्यासाठी तहसिल कार्यालय नवापूर येथे पहिला माळ्यवरील निवासी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नवापूर येथे गेले असता आपण, पंच नं. २ श्री.सुशिल वसावे व पोहेकॉ/महाजन असे सदर कार्यालयाचे बाजुला असलेल्या व्हरांडयात थांबुन होते तसेच पोलीस उपअधीक्षक श्री. जाधव सो., पोना/चिल्ले, पोना/अहिरे पोना/ज्योती पाटील असे संजय गांधी निराधार योजना कार्यालयाच्या समोरील व्हरांडयात थांबुन होते. त्यावेळी मी सोमु गावीत याना भेटलो असता त्यावेळी त्यांनी मागणी केलेले ५००/– रूपये लाचेची रककम मी माझे शर्टाचे खिशातुन काढुन त्यांचेसमोर धरले असता ते त्यानी उजवे हाताने स्विकारून त्याचे पॅन्टचे पुढील डावे बाजुस असलेल्या खिशात ठेवले. त्यावेळी मी सापळ्य पथकातील अधिकारी/कर्मचारी याना ठरलेल्या पुर्वनियोजित इशारा केला असता आपण, पंच नं २ श्री.सुशिल वसावे आणि सापळ्य पथकातील अधिकारी व कर्मचारी सक्षीय होवुन पहिला माळ्यवरील निवासी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नवापूर यांने कार्यालयात जावुन समुवेल गावीत यास पोना/चिल्ले व पोह/महाजन,पोना/नावाडेकर, अशांनी त्याचे दोन्ही हात मनगटापासुन घट्ट पकडून ठेवले. त्यादरम्यान आपण तक्रारदार श्री.जालमसिंग गावीत यांने शर्टाचे आतील बाजुस बनियनला लावण्यात आलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताब्यात ठेवले, ती वेळ १५.४३ वाजेची होती. त्यानंतर पोनि अहिरराव यांनी पच नं. १ श्री.वसावे यांना पंच नं.२ श्री. सुशिल वसवे यांच्या समक्ष लाचेची रककम कोणी घेतली व कोठे ठेवली बाबत विचारणा पंच नं. १ यांनी समक्ष कळविले की, सोमु गावीत यांनी मुळ तक्रारदार श्री. जालमसिंग गावीत याना इशारा करून लाचेची रककम देणे बाबत सांगीतल्याने तक्रारदार यानी सदर लाचेची रककम शर्टाचे खिशातुन काढुन त्यांचेसमोर धरले असता ते त्यानी उजवे हाताने स्विकारून त्याचे पॅन्टचे पुढील डावे बाजुस असलेल्या खिशात ठेवले सदर लाचेची रककम ५००/–रुपये पोनि अहिरराव यांनी पंच नं. २ श्री. वसावे यांचे मार्फतीने हस्तगत केली होती.त्यानंतर पोनि श्री.अहिरराव व सापळ्य पथकातील अधिकारी व कर्मचारी अशांनी सोमु गावीत याना ताब्यात घेवुन शासकीय विश्रामगृह, नवापूर येथे आणले. त्याठिकाणी पोनि अहिरराव यांनी उपअभियता, मार्गनिर्मिक बांधकाम विभाग नवापूर यांचे नावे लेखी पत्र देवुन एक स्वतंत्र कथायी मागणी केली असता तेथील उपस्थित स्टाफने एक स्वतंत्र कथ उपलब्ध करून दिल्याने पुढील क रवाई केली. तसा पोनि श्री.अहिरराव यानी सविस्तर पशस्त्री सापळ्य पंचनामा १५.१० ते २२:०० वाजेपावेतोचा करण्यात आलेला आहे.आज दि.०६/१०/२०२० रोजी समुवेल रामदास गावीत वय–२७ वर्ष, खाजगी इसम तहसिल कार्यालय, नवापूर रा. मु.पो. नागझरी, ता. नवापूर जि. नंदुरबार याने माझे कडुन माझे शेतीचे वाटणी हिस्सेचे काम करून देण्यासाठी माझे कडुन ५००/–रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रककम आज दिनांक ०६/१०/२०२० रोजी तहसिल कार्यालय नवापूर येथील पहिला माळ्यवरील निवासी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय नवापूर याचे कार्यालयाचे समोरील व्हरांडयात पंच साक्षीदारसमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे.तरी यातील समुवेल रामदास गावीत वय–२७ वर्ष, खाजगी इसम तहसिल कार्यालय, नवापूर रा. मु.पो. नागझरी, ता. नवापूर जि. नंदुरबार खाजगी इसम यांनी भ्रष्ट व बेकायदेशीर मागणे स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी माझेकडुन लाचेची मागणी करून ती लाच स्विकारली. म्हणून माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

Scanned by CamScanner